# विद्यार्थ्यांकडून सायबर जनजागृती

**सातारा :** रयत शिक्षण संस्थेच्या वर्ये येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च आणि क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांनी रयत सेवक बँकेच्या ग्राहक मेळाव्यात रयत सेवक व ग्राहकांना सायबर सुरक्षेचे धडे दिले.विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे विविध सायबर गुन्ह्यांची तसेच ऑनलाइन युगामध्ये होणारे सायबर गुन्हे कसे रोखता येतील, याबद्दल माहिती दिली. या वेळी कर्मचाऱ्यांकडून सायबर सुरक्षिततेची शपथ घेतली. या वेळी रयत सेवक बँकेचे अध्यक्ष राजेंद्र शिर्के, उपाध्यक्ष दिलीप डहाळे, बँकेचे सीईओ भास्कर कणसे, आयटी विभागप्रमुख विद्या यादव, केबीपी मॅनेजमेंटचे कॉम्प्युटर विभागप्रमुख आर. डी. कुंभार तसेच संचालक उपस्थित होते.